**आकाशवाणी नागपूर,**

**प्रादेशिक बातम्या (मराठी-वेळ सायंकाळी ०६.००)**

**रविवार दिनांक ०८ डिसेंबर २०२४**

**ठळक बातम्या**

1. **महाराष्ट्र विधानसभेच्या अध्यक्षपदाच्या निवडणुकीसाठी भाजपचे आमदार राहुल नार्वेकर यांची बिनविरोध निवड.**
2. **ईव्हीएमवरून विरोधी आणि सत्ताधारी पक्षांकडून आरोप - प्रत्यारोप सुरू.**
3. **फेंगल चक्रीवादळाचा परिणाम ओसरल्याने विदर्भात पुन्हा किमान तापमानात घट; पूर्व विदर्भात हलक्या पावसाची शक्यता.**
4. **१९ वर्षांखालील आशिया चषक क्रिकेट स्पर्धेच्या अंतिम सामन्यात भारताचा बांग्लादेशकडून ५९ धावांनी पराभव.**

**विधानसभा अध्यक्ष**

राज्य विधानसभेच्या अध्यक्ष पदावर आमदार राहुल नार्वेकर यांची बिनविरोध निवड झाली आहे. महाराष्ट्र विधानसभेच्या अध्यक्ष पदाच्या निवडणुकीसाठी भाजपकडून आमदार राहुल नार्वेकर यांनी आज अर्ज सादर केला. यावेळी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि अजित पवार, भाजप प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे उपस्थित होते. विधानसभा अध्यक्षपदासाठी आज दुपारी बारा वाजेपर्यंत अर्ज दाखल करण्याची मुदत होती. मात्र, महाविकास आघाडीकडून कोणताही अर्ज दाखल झाला नाही. त्यामुळे नार्वेकर यांची निवड बिनविरोध होत आहे. उद्या औपचारिक निवड झाल्यानंतर राज्यपाल सी.पी. राधाकृष्णन विधिमंडळाच्या दोन्ही सभागृहांच्या संयुक्त अधिवेशनाला संबोधित करतील.

**आमदार शपथविधी**

राज्य विधिमंडळाच्या विशेष अधिवेशनाच्या आजच्या दुसऱ्या दिवशी हंगामी अध्यक्ष कालीदास कोळंबकर यांनी उर्वरित १०५ नवनिर्वाचित आमदारांना विधानसभा सदस्यत्वाची शपथ दिली. काल अधिवेशनाच्या पहिल्या दिवशी १७३ नवनिर्वाचित आमदारांनी शपथ घेतली होती. आज नाना पटोले, राधाकृष्ण विखे पाटील, दिलीप सोपल, मंगलप्रभात लोढा, नितीन राऊत, विजय वडेट्टीवार, चंद्रशेखर बावनकुळे, भास्कर जाधव, जितेंद्र आव्हाड, अब्दुल सत्तार, अमित देशमुख, अस्लम शेख, तानाजी सावंत, आदित्य ठाकरे, यांनी विधानसभा सदस्यत्वाची शपथ घेतली. त्यानंतर सभागृहाचं कामकाज दिवसभरासाठी तहकूब करण्यात आलं. दरम्यान, विधानसभा आणि विधान परिषद कामकाज सल्लागार समितीची बैठक सोमवार दिनांक ९ डिसेंबर रोजी दोन्ही सभागृहाचं कामकाज संपल्यावर होणार असल्याचं सांगण्यात आलं आहे.

**ईव्हीएम/शरद पवार/रामदास आठवले**

युरोप खंडातील अनेक देशांनी आता ईव्हीएम मशीनला विरोध केला आहे. अमेरिका, इंग्लंड यासारख्या प्रगत देशांनीही आता ईव्हीएम मशीनला विरोध केला आहे. त्यामुळे निवडणूक आयोगानं आता बॅलेट पेपरवरती निवडणुका घ्याव्यात. यासाठीच हा ईव्हीएम विरोधी जनआक्रोश करण्यात येत असल्याचं राष्ट्रवादी कॉंग्रेसचे ज्येष्ठ नेते शरद पवार

म्हणाले. मारकडवाडी गावाला पवार यांनी आज भेट देऊन नागरिकांशी संवाद साधला. सोलापूर जिल्हयातील माळशिरस तालुक्यातील मारकडवाडी इथं नुकत्याच झालेल्या विधानसभा निवडणुकीत चुकीच्या पध्दतीनं मतदान झाल्याची शंका गावकऱ्यांनी उपस्थित केली आहे. त्यांनी बॅलेट पेपरवर मतदान घेण्याचा प्रयत्न केला होता. लोकशाही टिकविण्यासाठी 'ईव्हीएम मशीन नको' ही चळवळ अधिक तीव्र करण्याची गरज आहे. त्यासाठी आता तालुक्यातील प्रत्येक गावानं बॅलेट पेपरवरतीच मतदान घेण्यासाठीचा ठराव करावा, असं आवाहन पवार यांनी केलं आहे. दरम्यान मारकडवाडीतल्या लोकांचं प्रतिज्ञापत्र घेऊन निवडणूक आयोगाला भेटणार असल्याचं आमदार उत्तम जानकर यावेळी म्हणाले. निवडणूक आयोग जर मतपत्रिकेवर निवडणूक घ्यायला तयार असेल तर आपणही आमदारकीचा राजीनामा देऊन पुन्हा निवडणूक लढवण्यास तयार आहोत, असं जानकर यांनी सांगितलं. मारकडवाडी येथील ईव्हीएम मशीनमध्ये बिघाड झाला असण्याची शक्यता असू शकेल. मात्र, एखादं मशीन बिघडलं म्हणजे सर्वच ईव्हीएम खराब आहेत असा त्याचा अर्थ होत नाही.  ग्रामस्थांना काही शंका असतील तर निवडणूक आयोगानं त्याचा तपास करून शंकांचं  निरसन केलं पाहिजे, असं मत केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री रामदास आठवले यांनी आज नाशिकमध्ये व्यक्त केलं.

**ईव्हीएम /पृथ्वीराज चव्हाण**

राज्यघटनेतल्या तरतुदींनुसार निवडणूक आयोग स्वायत्त संस्था आहे. मात्र  सरकारच आयुक्तांची नेमणूक करीत असल्यानं आयोग सरकारला अपेक्षितच काम करतो. यामुळे आयोगाची स्वायत्तता धोक्यात आली असून  त्याची कार्यपध्दती आता सरकारी खात्याप्रमाणेच सुरू असल्याची टीका माजी मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण यांनी केली आहे. सातारच्या काँग्रेस भवनमध्ये आयोजित पत्रकार परिषदेत ते बोलत होते. मतदानासाठी ईव्हीएम वापराविरोधात देशव्यापी आंदोलन छेडणार असून त्यासाठी सह्यांची मोहीम राबवणार असल्याचं चव्हाण यांनी सांगितलं.

**ईव्हीएम /चंद्रशेखर बावनकुळे / एकनाथ शिंदे**

सत्ताधारी महायुतीच्या आमदारांनी ईव्हीएमच्या समर्थनार्थ आज विधानभवनाच्या पायऱ्यांवर घोषणाबाजी केली. आमदार सदाभाऊ खोत, गोपीचंद पडळकर, विजय देशमुख, बालाजी किणीकर यांनी आंदोलनात सहभाग घेतला. भारत माता की जय, वंदे मातरम या घोषणांसह ईव्हीएमला विरोध करणाऱ्या महाविकास आघाडीचा धिक्कार असो, अशा घोषणा या आमदारांनी यावेळी दिल्या. लोकांनी काम करणाऱ्यांना  निवडून दिलं आहे त्यामुळे  विरोधी पक्ष ईव्हीएम बाबत दुटप्पी भूमिका घेत आहे, असं प्रतिपादन उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी केलं आहे. यासंदर्भात विधानभवन मुंबई इथं वार्ताहरांशी ते बोलत होते-

***लोकसभेची आकडेवारी आपण जर पाहली तर महायुतीला २ कोटी ४८ लाख १२ हजार ६२७ मत आहे आणि आम्हाला जागा मिळाल्या १७ आणि महाविकास आघाडीला २ कोटी ५० लाख म्हणजे २ लाखाचा फरक आहे आणि महाविकास आघाडीला जागा मिळाल्या ३१ मग***

***हा EVM घोटाळा झाला म्हणायचा का ? मग तेव्हा त्यांनी कुठल्याही EVM च्या बद्दल आक्षेप घेतला नाही जेव्हा आपण हरतो तेव्हा EVM घोटाळा म्हणायचं आणि जेव्हा आपण जिंगतो तेव्हा मग EVM च्या ऐवजी बॅलेट पेपर ची मागणी कोणी करत नाही हे खरं म्हणजे दुटप्पीपणा आहे.***

दरम्यान, निवडणुकांत झालेला पराभव शरद पवार यांच्यासारख्या ज्येष्ठ नेत्याला स्वीकारता आला नाही. त्यामुळे ते जनतेची दिशाभूल करत आहेत, अशी टीका भाजपचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी केली आहे. ईव्हीएम मशीनला दोष देऊन आपलं अपयश लपवण्याचं पाप पवार करत आहेत, असं ते म्हणाले.

**क्षयरोग निर्मूलन**

देशाच्या टीबी विरोधातल्या लढ्यात, अधिक रुग्णसंख्या असलेल्या टीबी जिल्ह्यांवर लक्ष केंद्रित करून १०० दिवसांच्या विशेष मोहिमेमुळे देश बळकट झाला आहे, असं पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी म्हटलं आहे. समाजमाध्यमांवरील एका संदेशात मोदी यांनी सांगितलं की, रुग्णांना दुप्पट मदत, जन भागीदारी, नवीन औषधं, तंत्रज्ञानाचा वापर आणि निदानाची उत्तम साधनं यासह भारत विविध पद्धतींनी टीबीशी लढा देत आहे. क्षयरोगाचा नायनाट करण्यासाठी सर्वांनी एकत्र येण्याचं आवाहन त्यांनी केलं. दरम्यान, राष्ट्रीय क्षयरोग निर्मूलन कार्यक्रमांतर्गत राज्यातील १७ जिल्हयात तर देशात ३४७ जिल्हयात यावर्षी दि.७ डिसेंबर पासून १०० दिवसीय क्षयरोगमुक्त भारत मोहीम राबविण्यात येणार आहे. काल वाशीम इथं १०० दिवसीय राज्यस्तरीय क्षयरोग मोहिमेचं उद्घाटन केंद्रीय आरोग्य राज्यमंत्री प्रतापराव जाधव यांच्या हस्ते करण्यात आलं....

***आपण या वाशीम मधून या १०० दिवसीय अभियानाची सुरवात याठिकाणी करत आहो. येणाऱ्या पुढच्या काळात टीबी मुक्त भारत हि संकल्पना आपल्या पंतप्रधानांची आहे. ती प्रत्येक्षात आणण्यासाठी या सगळे प्रयत्न याठिकाणी केल्या जात आहे. आपल्या भारत देशामध्ये जवळपास जागतिक टक्केवारी १७.७ टक्के आहे. आपण या ठिकाणी भारतानं २०१५ पासून आपण याच्यामध्ये घट आणलेली आहे. त्या जागतिक सरासरीपेक्षा आपलं काम जे आहे भारत देशाचं ते त्याच्यापेक्षा दुप्पट चांगलं आहे.***

दरम्यान, राष्ट्रीय क्षयरोग दूरीकरण कार्यक्रमांतर्गत चंद्रपूर जिल्हयात 100 दिवस क्षयरोगमुक्त मोहिमेची सुरुवात खासदार प्रतिभा धानोरकर यांच्या हस्ते हिरवी झेंडी दाखवून करण्यात आली.

**संत जगनाडे महाराज जयंती**

संताजी स्मारक समिती, संताजी नवयुवक मंडळ आणि संताजी ब्रिगेड तेली समाज महासभा यांच्या संयुक्त विद्यमाने आज संतशिरोमणी संताजी जगनाडे महाराजांचा 400 वा जन्मोत्सव सोहळा, संत जगनाडे महाराज स्मारक जगनाडे चौक, नंदनवन, नागपूर इथं साजरा करण्यात आला. जन्मोत्सवानिमित्त हनुमान मंदिर पारडीपासून नंदनवन कॉलनीपर्यंत

भव्य शोभायात्रा काढण्यात आली. याप्रसंगी भाजपचे आमदार कृष्णा खोपडे, ॲड.यशवंत खोब्रागडे, मिलिंद चकोले आदी मान्यवर उपस्थित होते. दरम्यान, मानवता आणि लोककल्याणाची शिकवण देणारे संतश्रेष्ठ जगनाडे महाराज यांच्या जयंतीदिनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मुंबई इथल्या शासकीय निवासस्थानी महाराजांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन केलं. त्याचप्रमाणे संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठात महाराष्ट्राच्या संत परंपरेतील थोर संत जगनाडे महाराज यांची जयंती उत्साहात साजरी करण्यात आली.

**हवामान**

गेल्या आठवड्यात तामिळनाडूच्या समुद्रात तयार झालेल्या फेंगल चक्रीवादळाच्या प्रभावामुळे राज्यातल्या थंडीत घट होऊन ढगाळ वातावरण तयार झालं होतं. मात्र, फेंगचा प्रभाव ओसरल्यानंतर आता पुन्हा राज्यात थंडी परतण्याची शक्यता आहे. मागील 24 तासांत विदर्भात सर्वाधिक किमान तापमान चंद्रपूर इथं सोळा पूर्णांक आठ दशांश अंश सेल्सिअस इतकं नोंदवण्यात आलं. गडचिरोली इथं 17 अंश, गोंदिया इथं 19.6° तर, भंडारा इथं 20 अंश सेल्सिअस किमान तापमानाची नोंद करण्यात आली. तर पश्चिम विदर्भातील बुलढाणा आणि अकोला इथं किमान तापमान 17 अंश सेल्सिअस राहिलं. दरम्यान मागील 24 तासांत अकोला येथे सर्वाधिक 33.7 दशांश अंश सेल्सिअस इतक्या कमाल तापमानाची नोंद करण्यात आली आहे. येत्या काही तासांत नागपूरसह, भंडारा, चंद्रपूर आणि यवतमाळ इथं हलक्या पावसाची शक्यता आहे ,तर उद्या देखील चंद्रपूर आणि गडचिरोली इथं तुरळक पावसाची शक्यता वर्तवण्यात आली आहे.

**१९ वर्षांखालील आशिया चषक क्रिकेट**

दुबई इथं 19 वर्षाखालील आशिया चषक क्रिकेट स्पर्धेच्या अंतिम सामन्यात आज भारताचा बांगलादेशकडून 59 धावांनी पराभव झाला आहे. या सामन्यात भारताने नाणेफेक जिंकून प्रथम क्षेत्ररक्षणाचा निर्णय घेतला. प्रथम फलंदाजी करत बांगलादेशानं भारतासमोर विजयासाठी 199 धावांचं आव्हान ठेवलं होतं. मात्र प्रत्युत्तरात भारताचा संपूर्ण संघ 35 षटकं आणि 2 चेंडूंत 139 धावा काढून बाद झाला. भारताच्या एकाही फलंदाजाला २६ पेक्षा अधिक धावसंख्या उभारता आली नाही.

*****